उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा
प्रशासकीय इमारत राष्ट्रिय महामार्ग क्र. ६ त. जि. भंडारा

ईमेल mh36@mahatranscom.in
फोन नं. ०७१८४-२५८१६५

जा. क्र. 1189 /अभि/उपप्रापअ/भं/२०२३
दिनांक :- 05/10/२०२३

प्रति,
Principal
R.M. Patel girls college
Bhandara

**विषय :- मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १९४D नुसार कारवाई करण्याबाबत.**
**संदर्भ :- मा. परिवहन आयुक्त, महा. राज्य, मुंबई यांनी दि. 26/05/2023 रोजी झालेल्या बैठकीत दिलेले निर्देश.**

उपरोक्त् विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मा. परिवहन आयुक्त, मुंबई यांनी बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार मोटार वाहन कायदा १९८८ कलम १२८ व १२९ नुसार मोटार सायकलच्या चालकाने मोटार सायकल चालवितांना स्वत:खेरीज एकापेक्षा जास्त व्यक्तिंना मोटार सायकलवरून घेवून जाता कामा नये. तसेच सर्वांनी हेल्मेट घालणे बंधनकारक आहे.

मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १९४ (सी) व (डी) नुसार मोटार सायकल चालवितांना अधिक प्रवासी आढळल्यास अथवा चालक/प्रवासी विना हेल्मेट आढळून आल्यास त्यांच्यावर मोटार वाहन कायदयाअंतर्गत कारवाई करुन १०००/- रु. दंड असुन त्यांची अनुज्ञप्ती ३ महिन्याकरीता निलंबित करण्याचे प्रावधान आहे.

तसेच आपणास कळविण्यात येते की कलम १९४ डी मधील तरतुदीनुसार विना हेल्मेट वाहन चालविण्याची मुभा देणाऱ्यालाही उपरोक्त प्रमाणे दंड आकारण्याची तरतुद आहे.

त्यानुसार आपण आपल्या आस्थापनेवरील सर्व कर्मचारी/विद्यार्थी यांना हेल्मेट घालूनच प्रवास करण्याची ताकीद दयावी. यापुढे आपल्या आस्थापनेतील कर्मचारी/विद्यार्थी विना हेल्मेट प्रवास करतांना आढळल्यास कलम १९४ (डी) नुसार सदर वाहन चालक/ प्रवासी यांचेसह त्यासाठी मुभा देणारी व्यक्ति या नात्याने आपण कायदेशीर कारवाईस पात्र राहाल व सदर कारवाई आपणावर करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी**
**भंडारा**

**प्रत** — वायुवेग पथक, आपणास आदेशित करण्यात येते की, वरील सर्व आस्थापनाच्या ठिकाणी जावून मोटार वाहन कायद्याअंतर्गत तपासणी करुन तसा अहवाल कार्यालयास सादर करावा.

**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी**
**भंडारा**

E:\Desktop\kirti\kulmate babu\Road sefty\जिल्हा रस्ता सुरक्षा समितीMH36



CamScanner